# चालू घडामोडी - २०२४ ( मे )

- दरवर्षी 'आंतरराष्ट्रीय कामगार दिन' 01 मे रोजी जगभरात साजरा केला जातो. ( भारतात 01 मे 1923 रोजी पहिला कामगार कामगार दिवस चेन्नई येथे साजरा करण्यात आला होता. तसेच 01 मे हा दिवस देशातील महाराष्ट्र व गुजरात या दोन राज्याचा स्थापना दिवस म्हणून साजरा केला जातो. )
- 'ॲडमिरल दिनेश कुमार त्रिपाठी' यांनी भारतीय नौदलाचे 26 वे नौदल प्रमुख म्हणून पदभार स्वीकारला आहे.
- 'आलोक शुक्ला' यांना 'गोल्डमॅन एन्व्हायर्नमेंट प्राइज 2024'पर्यावरण पुरस्कार प्राप्त झाला आहे .
- Fintech कंपनी 'CRED' ने ऑफलाइन QR कोड आधारित 'Scan and Pay' सेवा सुरू केली आहे.
- राजस्थान मधील बाडमेर मध्ये देशातील सर्वाधिक 46 अंश डिग्री सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. ( त्यानंतर पश्चिम बंगाल राज्यातील कलाईकुंडा येथे देशातील सर्वाधिक 47.2°C तापमानाची नोंद झाली आहे. )
- निलगिरी ( मेंडी ) तहर या प्राण्याचे सर्व्हेक्षण करण्यात येत असून हा तामिळनाडू या राज्याचा राज्य प्राणी आहे.
- भारताच्या अभय शर्मा यांची युगांडा देशाच्या क्रिकेट संघांच्या मुख्य प्रशिक्षक पदी नियुक्ती करण्यात आली आहे.
- स्मार्ट हे क्षेपणास्त्र DRDO या संस्थेद्वारे विकसित करण्यात आले आहे.
- कुमार जागतिक बॅडमिंटन स्पर्धा 2025 भारतात गुवाहाटी येथे आयोजित करण्यात येणार आहे. ( या जागतिक बॅडमिंटन स्पर्धेचे यजमानपद भारत या देशाला मिळाले आहे. )
- IERDA ही नवरत्न दर्जा प्राप्त करणारी भारतातील 18वी कंपनी ठरली आहे. ( या कंपनीची स्थापना 1987 साली झाली आहे. )
- 'जागतिक पत्रकार स्वातंत्र्य दिन' दरवर्षी 03 मे रोजी साजरा केला जातो.
- अलीगढ मुस्लिम विद्यापीठाचे प्रा. मोहम्मद रिहान यांनी राष्ट्रीय सौर ऊर्जा संस्थेचे (NISE) महासंचालक म्हणून पदभार स्वीकारला आहे.
- ई-वाहन खरेदी करणाऱ्यामध्ये देशात उत्तर प्रदेश पहिल्या क्रमांकावर तर महाराष्ट्र हा दुसऱ्या क्रमांकावर आहे.
- आंतरराष्ट्रीय अग्निशामक दिन दरवर्षी 4 मे रोजी साजरा केला जातो.
- करीना कपूरची UNICEF इंडियाच्या राष्ट्रीय राजदूत म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.
- हार्वर्ड प्रोग्राम सुरू करणारे चंदीगड विद्यापीठ हे भारतातील पहिले विद्यापीठ ठरले आहे.
- सुबोध कुमार (IAS) यांची आयुष मंत्रालयात संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.
- भारताचे स्वदेशी बनावटीचे पहिले मानव रहित बॉम्बर विमान 'फ्लाईंग वेज डिफेन्स अँड एरोस्पेस टेक्नॉलॉजी' या कंपनीने बनवले आहे. ( FWD-200B असेही त्यालाम्हंटले जाते. )

- जगातील व भारतातील पहिली CNG बाईक बजाज या कंपनीने तयार केली आहे.
- काँगो देशाने मंकी पॉक्स या विषाणू ला आरोग्य आणीबाणी म्हणून जाहीर केले आहे.
- जगातील सर्वाधिक उंच वेधशाळा जपान या देशात स्थापित करण्यात आली आहे.
- चीन पहिल्यांदा आपल्या चांद्रयान मोहिमेमध्ये पाकिस्तान या देशाच्या ऑर्बिटर चा समावेश केला आहे.
- फ्रान्स मध्ये पार पडलेल्या इंटरपोल परीषद (महासभा) ला भारतातर्फे प्रवीण सुद उपस्थित होते.
- भारत आणि इंडोनेशिया देशाच्या संयुक्त संरक्षण सहकार्य समितीच्या 7व्या बैठकीचे आयोजन नवी दिल्ली येथे करण्यात आले होते.
- 'ला लिगा फुटबॉल' स्पर्धेचे विजेतेपद 'रेयाल माद्रिद' संघाने पटकावले आहे.
- पेंशन विभागाने सरकारी निवृत्त कर्मचाऱ्या साठी 'भविष्य' पोर्टल लाँच केले आहे.
- उत्तराखंड टुरिझमने "नक्षत्र सभा" ही भारतातील पहिली  खगोल- पर्यटन मोहीम सुरू केली.
- भारतीय वंशाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स नासाच्या स्टारलाइनर मोहिमेअंतर्गत तिसऱ्यांदा अंतराळात जाणार आहेत. ( सुनीता विल्यम्स ने 2006 आणि 2012 वर्षी अंतराळात प्रवेश केला होता.)
- 18 व्या लोकसभेच्या निवडणुका  7 टप्प्यांत  होणार आहेत - महाराष्ट्र राज्य निवडणूक सदिच्छा अभिनेत्री म्हणून  मृणाल कुलकर्णी नियुक्ती करण्यात आली. अलिकडेच छत्तीसगड राज्याने कृषक उन्नती योजना लागू केली ?

---

- अखिल भारतीय बुद्धिबळ महासंघाच्या अध्यक्षपदी नुकतीच  नितीन सारंग यांची निवड करण्यात आली.
- पुलित्झर पुरस्कार दरवर्षी पत्रकारीता क्षेत्रातील योगदानाबद्दल दिला जातो.- पुलित्झर पुरस्कार 2024 मध्ये "रॉयटर्स" वृतसंस्थेला छायाचित्रणाच्या श्रेणीतील पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.
- जर्मनी देशाच्या कंपनीने अलीकडेच मेणबत्तीच्या मेणावर चालणाऱ्या रॉकेटची चाचणी केली आहे.
- राष्ट्रीय तंत्रज्ञान दिवस 11 मे रोजी साजरा केला जातो आणि आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन दरवर्षी 12 मे रोजी साजरा केला जातो.
- आंतरराष्ट्रीय आनंदी दीन 20 मार्च रोजी साजरा करण्यात येतो ( जागतिक आनंदी अहवाल 2024 नुसार 143 देशाच्या यादीत भारताचा कितवा क्रमांक आहे 126 - प्रथम फिंलेंड )
- आंतरराष्ट्रीय वन दीन 21 मार्च रोजी साजरा करण्यात येतो.
- रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने 'आर लक्ष्मी कांथ राव' यांना प्रभारी अध्यक्ष म्हणून नियुक्त केले आहे.
- जगातील सर्वाधिक वजनदार रॉकेट स्टारशिप चे चौथ्यांदा उड्डाण करण्यात येत असून हे रॉकेट SPACE X या कंपनीने बनवले आहे. (सुनीता विल्याम या मध्ये परत एकदा अंतराळात जाणार आहे )
- नुकताच भारताचा 85 वा बुद्धिबळ ग्रँड मास्टर  पी श्याम निखिल बनला आहे .
- ज्येष्ठ गायिका लता मंगेशकर यांच्या स्मृित दिनानिमित्त देण्यात येणारा दीदी पुरस्कार  विभावरी आपटे यांना प्रदान करण्यात आला आहे.

- जगातील सर्वात प्रदुषित शहर ठरलेले बेगुसराय हे भारतातील बिहार राज्यात आहे.
- मेगन हे चक्रीवादळ ऑस्ट्रेलिया देशात आले आहे.
- उत्तराखंड राज्याने पर्यटनाला चालना देण्यासाठी खालीलपैकी मानसखंड एक्सप्रेस ही विशेष पर्यटन ट्रेन सुरू केली.
- बंगालच्या उपसागरामध्ये तयार झालेल्या चक्रीवादळाला ओमान या देशाने 'रेमल' हे नाव दिले असून त्याचा अर्थ "वाळू" आहे.
- सौदी अरेबिया या देशातील मक्का शहराजवळ सोन्याचा डोंगर सापडला आहे.
- देशातील पहिली ॲडव्होकेट अकादमी रायगड या जिल्ह्यात उभरण्यात येणार आहे.
- युरोपियन संघाने पहिल्या Al articficel inteligence कायद्याला मंजुरी दिली आहे.
- 10 वी जागतिक जलपरिषद 18 ते 25 मे 2024 रोजी बाली (इंडोनेशिया) येथ आयोजित करण्यात आली होती.
- आलीकडेच कर्नाटक राज्याने सरकारी नोकरीमध्ये महिलांना 33 टक्के आरक्षण दिले आहे ?
- 'नवी दिल्ली' येथे सायबर सिक्युरिटी कॉन्क्लेव्ह 2024 चे आयोजन करण्यात आले आहे.
- भारतात आजपर्यंत आलेले सर्वात मोठे जहाज गुजरात मधील मुद्रा बंदरामध्ये दाखल झाले असून एमएससी ॲना असे या जहाजाचे नाव आहे.
- स्मार्टफोन ही भारताची चौथी सर्वात मोठी निर्यात वस्तू बनली आहे.
- टी-20 आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये विराट कोहली 4037 धावासह प्रथम स्थानावर आहे
- रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने आरबीआय रिटेल डायरेक्ट ॲप लॉंच केले आहे.
- RBI संस्थेद्वारे प्रवाह पोर्टल लॉंच करण्यात आले आहे.

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र
ध्येयवेड्या स्पर्धकांना समर्पित ..

शब्दसंकलन - अविनाश चुंबळे

आधिक महितीसाठि संकेतस्थळाला भेट द्या
www.mpscshort.in

( Teligram चेनल जॉइन करा आणि मिळवा सर्व स्पर्धा परीक्षा अपडेट मोफत @mpscshorts )